# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः12.12.2024** **वारःगुरुवार**

---

1. राष्ट्रीय पंचायत पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान, पुण्यातल्या यशदासह महाराष्ट्राला 6 पुरस्कार
2. युवकांमधला नवोन्मेष आणि तंत्रज्ञान कौशल्य ही देशाची खरी ताकद-पंतप्रधानांचं प्रतिपादन, स्मार्ट इंडिया हॅकेथॉन अंतिम फेरीचा आरंभ
3. संयुक्त राष्ट्र संघटनेचा 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' हा जीवनगौरव पुरस्कार पर्यावरणतज्ञ डॉक्टर माधव गाडगीळ यांना जाहीर
4. 'शांतता पुणेकर वाचत आहेत' उपक्रमात साडेतीन लाख पुणेकर सहभागी आणि
5. महिलांच्या पन्नास षटकांच्या क्रिकेट मालिकेत ऑस्ट्रेलियाचा भारतावर संपूर्ण विजय

**<u>पंचायत पुरस्कार</u>**

यावर्षीच्या राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांचं वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल नवी दिल्लीतील विज्ञान भवन इथं झालं. यंदा विविध श्रेणींमध्ये एकंदर 45 पुरस्कार विजेत्यांची निवड करण्यात आली असून ओडिशा आणि त्रिपुरा राज्यांना सर्वाधिक असे प्रत्येकी 7 पुरस्कार मिळाले, त्यापाठोपाठ महाराष्ट्र राज्याला 6 पुरस्कार मिळाले आहेत. पंचायत क्षमता निर्माण श्रेणीत पुण्यातल्या यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन अकादमी-यशदाला तृतीय पुरस्कार मिळाला. सातारा जिल्ह्यातल्या पाटण तालुक्यातल्या मान्याची वाडी ग्रामपंचायतीनं नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत शाश्वत विकास पुरस्कार श्रेणीत सर्वोत्तम ग्राम पंचायत पुरस्कार, तसंच ग्राम ऊर्जा स्वराज विशेष ग्राम पंचायत असे 2 पुरस्कार पटकावले. गोंदिया जिल्ह्यातल्या तिरोडा पंचायत गटाला नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत शाश्वत विकास पुरस्कार श्रेणीत सर्वोत्तम पंचायत गट हा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. तर नाशिक जिल्ह्यातल्या इगतपुरी गटाअंतर्गत मोडाळे ग्रामपंचायतीला दीनदयाळ उपाध्याय पंचायत शाश्वत विकास पुरस्कार श्रेणीत स्वच्छ आणि हरित ग्रामपंचायत हा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. भंडारा जिल्ह्यातल्या बेला ग्रामपंचायतीनं कार्बन न्यूट्रल विशेष पंचायत श्रेणीत तृतीय क्रमांकाचा पुरस्कार पटकावला आहे.

देशातील 64 टक्के लोक ग्रामीण भारतात राहत असल्यानं भारताला बळकट आणि विकसित राष्ट्र बनवण्यासाठी गावांचा आणि ग्रामस्थांचा विकास महत्त्वाचा असल्याचं राष्ट्रपतींनी यावेळी बोलताना सांगितलं. गरीबी निर्मूलन, आरोग्य, बालकल्याण, जलसंधारण, स्वच्छता, पायाभूत सुविधा, सामाजिक न्याय, शासन आणि महिला सशक्तीकरण यातील पंचायतींच्या प्रयत्नांचं कौतुक करण्यासाठी आणि प्रोत्साहन म्हणून राष्ट्रीय पंचायत पुरस्कार दिले जातात. यंदा 1 लाख 94 हजार ग्रामपंचायतींनी स्पर्धेत भाग घेतला होता आणि यातल्या पुरस्कारप्राप्त 42 टक्के पंचायतींचं नेतृत्व महिलांच्या हाती आहे.

**<u>स्मार्ट इंडिया हॅकेथॉन</u>**

भारताचं सामर्थ्य आमची युवा शक्ती आहे. आणि युवकांमधला नवोन्मेष आणि तंत्रज्ञान कौशल्य ही आमची खरी ताकद असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनच्या अंतिम फेरीतील तेराशे विद्यार्थ्यांशी पंतप्रधानांनी दूरस्थ पद्धतीनं संवाद साधला. देशभरातल्या 51 केंद्रांवर या स्पर्धा सुरू आहेत.

देशातले युवक विविध समस्यांवर उपाय शोधून तोडगा काढत सरकारला साथ देत असून यामुळं भारत विकसित होण्याच्या मार्गावर आहे याचा विश्वास वाटतो असं पंतप्रधान म्हणाले.

हॅकेथॉनच्या काल सुरू झालेल्या अंतिम फेरीत राज्यातल्या मुंबई, पालघर, बुलडाणा, नांदेड, कोल्हापूर, नाशिक धुळे, पुणे, नागपूर, वर्धा, सोलापूर, ठाणे, सांगली आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमधल्या विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. पुण्यातील एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठात हार्डवेअर गटाची अंतिम फेरी होत आहे.

**ईवीएम पडताळणी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत व्हिव्हीपॅट पडताळणीबाबत सर्व प्रक्रियेचं तंतोतंत पालन केल्याचं, निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघातल्या कोणत्याही पाच मतदान केंद्रावरच्या व्हिव्हीपॅट चिठ्ठ्या मोजल्या जातात; यानुसार 23 नोव्हेंबर रोजी केलेल्या मतमोजणीच्या वेळी या चिठ्ठ्या मोजण्यात आल्या. तेव्हा उमेदवारांचे प्रतिनिधीही  उपस्थित होते असं आयोगानं म्हटलं आहे. अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी, डॉक्टर किरण कुलकर्णी यांनी हे स्पष्टीकरण देताना सांगितलं.....

**पुरस्कार**

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पर्यावरण कार्यक्रमाद्वारे 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' हा जीवनगौरव पुरस्कार पर्यावरणतज्ञ डॉक्टर माधव गाडगीळ यांना जाहीर झाला आहे. हा प्रतिष्ठीत पुरस्कार मिळालेल्या जगभरातील सहा मान्यवरांमध्ये त्यांचा समावेश आहे. निसर्ग आणि मानव यांच्यासोबत समरसता राखत असताना निसर्गाचा ऱ्हास करणाऱ्या मानवी कृतींच्या विरोधात आणि पर्यावरण रक्षणासाठी लढणाऱ्या लोकांच्या बाजूनं देखील डॉक्टर गाडगीळ यांनी वेळोवेळी ठाम भूमिका घेतली आहे. खऱ्या अर्थानं ते पृथ्वीचे संरक्षक आणि संवर्धक म्हणजेच चँपियन आहेत.

गेल्या सहा दशकांपासून पर्यावरण रक्षणासाठी अव्याहतपणे झटणाऱ्या महाराष्ट्र सुपुत्राला आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेचा 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' जीवनगौरव पुरस्कार मिळणं देश आणि राज्यासाठी अभिमानास्पद आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ पर्यावरणशास्त्रज्ञ डॉक्टर माधव गाडगीळ यांचं अभिनंदन केलं आहे. जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही गाडगीळ यांचं अभिनंदन केलं आहे. पर्यावरणाशी निगडीत सखोल संशोधन, त्याची वस्तुनिष्ठ पद्धतीनं तर्कशुद्ध मांडणी आणि सक्रीय लोकसहभाग यांच्या माध्यमातून डॉक्टर माधव गाडगीळ यांनी केलेलं कार्य या पुरस्कारामुळं जागतिक पातळीवर अधोरेखित झालं आहे, असंही त्यांनी म्हटलं आहे.

**पुणे पुस्तक महोत्सव**

राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाअंतर्गत पुणे शहरात ठिकठिकाणी 'शांतता... पुणेकर वाचत आहेत' उपक्रम काल राबवण्यात आला. साडेतीन लाख लोक या उपक्रमात सहभागी झाले. हा प्रतिसाद पाहता आगामी  पुणे पुस्तक महोत्सव अधिक व्यापक होईल असा विश्वास महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे यांनी व्यक्त केला. या उपक्रमाला सर्व स्तरांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पुण्यासह राज्य, देश आणि परदेशातूनही या उपक्रमात सहभाग नोंदवण्यात आला.

केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार हेमंत रासने, सिद्धार्थ शिरोळे, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, अभिनेत्री विभावरी देशपांडे, लेखक किरण यज्ञोपवीत, रमेश परदेशी, ज्येष्ठ लेखक वसंत लिमये, उद्योजक पुनीत बालन, अशा अनेकांनी या उपक्रमात सहभाग घेतला. तसंच

समता भूमी, महात्मा फुले मंडई, अंधशाळा, मेट्रो स्थानक, पुणे महापालिका अशा ठिकाणी पुस्तक वाचन करण्यात आलं. अग्निशमन केंद्रातील सर्व कर्मचाऱ्यांनी यामध्ये भाग घेतला.

उपक्रमाचा मुख्य कार्यक्रम आप्पा बळवंत चौक, तांबडी जोगेश्वरी मंदिर इथं पार पडला. यावेळी माजी मंत्री आमदार चंद्रकांत पाटील यांनी लेखक सागर देशपांडे यांचं 'दुर्दम्य आशावादी डॉक्टर रघुनाथ माशेलकर' या पुस्तकाचं वाचन केलं. पुणे विद्यापीठात हा उपक्रम तसंच भाषा उत्सवानिमित्त अभिनेता प्रवीण तरडे यांनी बोलताना, संस्कृती, प्रदेश, भूगोल, राजकीय मतभेद आणि वैचारिक तटभिंती ओलांडून आपण माणसांशी वागलं पाहिजे, संस्कार वाचनातून होतो आणि ग्रंथ हेच खरं जगण्याचं सामर्थ्य आहे असं सांगितलं. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर 14 ते 22 डिसेंबर या कालावधीत पुणे पुस्तक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

**<u>पादचारी दिन</u>**

पुणे महापालिकेतर्फे काल लक्ष्मी रस्त्यावर पादचारी दिन साजरा करण्यात आला. पादचाऱ्यांची सुरक्षितता आणि त्यांच्या अधिकारांबबत जागरुकता वाढविण्यासाठी गेल्या चार वर्षांपासून हा उपक्रम आयोजित केला जातो.

**<u>रेल्वे</u>**

महाराष्ट्रात रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांमध्ये 1 लाख 64 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल लोकसभेत दिली. राज्यात रेल्वेला प्रत्येक स्थानकावर थांबा देण्यासंदर्भात खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. पुण्याहून रेल्वे मार्गाचं दुहेरीकरण तसंच तिहेरीकरणाचं काम सुरु असून, रेल्वे थांबे वाढवण्यात येणार आहेत असं वैष्णव म्हणाले.

**<u>क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात काल पर्थ इथे झालेल्या पन्नास षटकांच्या तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारताचा 83 धावांनी पराभव करत ही संपूर्ण मालिका जिंकली. 299 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा डाव 45 षटक आणि एका चेंडूत 215 धावांतच आटोपला. भारताकडून स्मृती मंधानाने सर्वाधिक 105 धावा केल्या. अरुंधती रेड्डीनं 4 बळी घेतले. तत्पूर्वी, ॲनाबेल सदरलँडच्या शतकाच्या जोरावर ऑस्ट्रेलियानं 6 गडी गमावून 298 धावा केल्या. ॲनाबेलनं 95 चेंडूत 110 धावा केल्या.

**<u>हवामान</u>**

गोंदिया इथं सर्वात कमी 9 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्या सकाळपर्यंत राज्यात हवा कोरडी राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.